# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

Maharashtra Industrial Development Corporation

(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९

प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)

www.midcindia.org


जा.क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/ P164204 दिनांक: 13/01/2025

## परिपत्रक

**विषय: महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२१ च्या अनुषंगाने इलेक्ट्रिक वाहन निर्मितीचे कारखाने तसेच ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी, इलेक्ट्रिक वाहनांचे सुटे भाग आणि त्याचे recycling कारखाने तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग स्टेशनकरिता प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबत.**

संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/ए-९७७१, दिनांक २१.०३.२०२२
(२) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/बी५७९३२, दिनांक १०.०५.२०२३

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२१ च्या अनुषंगाने महामंडळाने संदर्भाधीन परिपत्रकांन्वये इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचे कारखाने तसेच ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी, इलेक्ट्रीक वाहनांचे सुट्टे भाग आणि त्यांचे recycling कारखाने तसेच इलेक्ट्रीक वाहनांच्या चार्जिंग स्टेशनकरिता प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहेत.

तथापि, सदर धोरणास गुंतवणूकीची अट लागू नसल्याने बहुतांश उद्योजक मोक्याच्या जागा ताब्यात घेण्याच्या उद्देशाने या धोरणाचा गैरफायदा घेत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे गरजु उद्योजक भूखंड वाटपापासुन वंचीत राहतात व औद्योगिक विकासास खीळ बसत आहे. यामुळे महामंडळाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर बाबींचा विचार करता, महामंडळाच्या दिनांक २१.०३.२०२२ रोजीच्या धोरणात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

(१) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ मव्य(भूमी)/ए-९७७१, दिनांक २१.०३.२०२२ अन्वये निर्गमित करण्यात आलेले धोरण केवळ **इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचे कारखाने व ऍडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी** या प्रयोजनाकरिता भूखंड वाटपाबाबत लागू राहील. तथापि, इतर प्रयोजनाकरिता महामंडळाचे प्राधान्य सदराखाली भूखंड वाटपाबाबतचे प्रचलित धोरण लागू राहील.

(२) महामंडळाच्या परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ मव्य(भूमी)/ए-९७७१, दिनांक २१.०३.२०२२ तसेच परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/बी५७९३२, दिनांक १०.०५.२०२३ मध्ये उपरोक्त सुधारणेशिवाय अन्य कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

13.01.25

(अनिल भंडारी, भाप्रसे)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन / मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि. / डीएमआयसी / पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.